<u>प्रेसनोट</u> दि. ३१/०७/२०२४.

## लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील सहायक पोलीस निरीक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. ७४६/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय -३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | चेतन चंद्रकांत थोरबोले, वय ३६ वर्ष, पद - सहायक पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस चौकी, लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर. (वर्ग-२) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- रुपये (पाच लाख रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | १,००,०००/- रुपये (एक लाख रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ०१/०७/२०२४, दि. ०४/०७/२०२४, दि. ११/०७/२०२४ व दि. २४/०७/२०२४. |
| गुन्हा दाखल दिनांक | दि. ३१/०७/२०२४ |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे विरुद्ध लोणीकंद पोलीस स्टेशन येथे अर्ज दाखल होता. सदरचा अर्ज चौकशीकामी वाघोली पोलीस चौकीचे लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक चेतन थोरबोले यांचेकडे होता. तक्रारदार यांचेविरुद्ध दाखल अर्जामध्ये निल अहवाल पाठविण्यासाठी व त्यामध्ये तक्रारदार यांना भविष्यात त्रास न होण्यासाठी लोकसेवक चेतन थोरबोले यांनी तक्रारदार यांचेकडे ५ लाख रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक चेतन थोरबोले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरूध्द दाखल अर्जामध्ये निल अहवाल पाठविण्यासाठी व त्यामध्ये तक्रारदार यांना भविष्यात त्रास न होण्यासाठी प्रथम ०५ लाखाची मागणी करुन, तडजोडीअंती १,००,०००/- (एक लाख रुपये) रुपयांची लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.